॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## विद्यार्थी विकास विभाग

जा.क्र. कबचौउमवि/१४/दि.म.- ८६/१८० /२०२५ दि.१७/०९/२०२५

प्रति,

**मा.प्राचार्य / संचालक / विभाग प्रमुख,**
**विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालय / मान्यताप्राप्त परिसंस्था व**
**विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा / विभाग यांना ..**

**विषय :- कै.भाईसाहेब वाय.एस.महाजन मुलींची वक्तृत्व स्पर्धा व "कै. ग. वी. अभ्यंकर मराठी नाट्यगीत व कै. शांताबाई अभ्यंकर मराठी भावगीत गायन" स्पर्धेबाबत..**

**संदर्भ :-** १) जा.क्र. कबचौउमवि/१४/विवि/आमयुम-३३/१५०/२०२५, दि. २०.०८.२०२५
२) जा.क्र. कबचौउमवि/१४/युम-३३/१७८/२०२५, दि.१६.०९.२०२५

महोदय / महोदया,

आपणास विदीतच आहे की, मा. अध्यक्ष, पर्यावरण व सामाजिक शिक्षण संस्था, जळगाव यांचेकडून प्राप्त देणगीव्दारे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विद्यार्थीनींकरीता कै .भाईसाहेब वाय.एस.महाजन यांच्या नावे वक्तृत्व स्पर्धेचे तसेच कै. प्रा. पी.जी. अभ्यंकर, जळगाव यांनी दिलेलेल्या देणगीतून "कै. ग. वी. अभ्यंकर मराठी नाट्यगीत व कै. शांताबाई अभ्यंकर मराठी भावगीत गायन" स्पर्धेचे आयोजन दरवर्षी करण्यात येत असते.

सदर स्पर्धांना विद्यार्थ्यांचा प्रतिसाद पाहता, विद्यार्थी विकास मंडळाच्या दि. ११ जूलै, २०२५ रोजीच्या प्रथम सभेत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील वरील दोन्ही स्पर्धा मागीलवर्षा प्रमाणेच युवारंग महोत्सवातच घ्याव्यात असे ठरलेले आहे.

त्याअनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सवाचे आयोजन **दि. ०८ ते १२ ऑक्टोंबर, २०२५** या कालावधीत **जी.एच. रायसोनी अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालय, जळगाव** येथे आयोजित करण्यात येत आहेत. या महोत्सवात होणा-या वक्तृत्व स्पर्धेमध्ये **कै.भाईसाहेब वाय.एस.महाजन यांच्या नावे** मुलींना वेगळी पारितोषिके देण्यात येतील व नाटयगीत आणि सुगम संगीत या स्पर्धांमधून मराठी नाटयगीत व भावगीतांसाठी **"कै. ग. वी. अभ्यंकर मराठी नाट्यगीत व कै. शांताबाई अभ्यंकर मराठी भावगीत गायन साठीची पारितोषिके** देण्यात येतील, महाविद्यालयांनी कृपया याची नोंद घ्यावी, हि विनंती.

धन्यवाद !

आपला विश्वासू,

17.9.25

(डॉ. जयेंद्र लेकुरवाळे)
**संचालक, विद्यार्थी विकास**

**प्रत - मा. संचालिका, जी.एच. रायसोनी अभियांत्रिकी व व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालय, जळगाव**
**प्रतिलिपी -**

१) मा. कुलगुरु कार्यालय,कबचौउमवि, जळगाव
२) मा.प्र-कुलगुरु कार्यालय,कबचौउमवि, जळगाव
३) मा. कुलसचिव कार्यालय,कबचौउमवि, जळगाव
४) मा. वित्त व लेखा अधिकारी,कबचौउमवि, जळगाव